# धर्म रक्षक कोण ?

प्रिय बहाई मित्र,

अल्ला अबहा,

## आपली निष्ठा कोणाच्या प्रति आहे?

धर्म रक्षक विहीन (hetrodox) छलकपट वर आधारित आणि संपूर्ण विश्वात प्रभू धर्माच्या प्रेमियांना पथ भ्रष्ट करणाऱ्या विश्व न्याय मंदिराच्या प्रति कि संविदा केन्द्र अब्दुल बहा आणि त्यांच्या प्रथम धर्मरक्षक शोगी आफेन्दी यांच्या इच्छा नुसार?

जर आपण अब्दुल बहा यांच्या 'वसीयत' (Will and Testament) चा अध्ययन कराल तर आपण स्वतः बघाल कि अब्दुल बहांचा कथन आहे कि :

''धर्म रक्षकासाठी हे अनिवार्य आहे कि त्याने आपल्या जीवितकाळात दूसरा धर्मरक्षक (आपल्या उत्तराधिकारी) नियुक्त करावा.''

काय आपण हे मानायला तयार आहोत कि आमच्या प्रथम धर्मरक्षक शोगी आफेन्दी यांनी संविदा केंद्र असलेल्या अब्दुल बहा यांच्या इच्छा विपरीत कार्य करून आपल्या नंतर, दूसऱ्या धर्मरक्षकाची नियुक्ति केली नाही, हे शक्य नाही.

जसं कि सगळ्यांना माहित आहे कि संविदा केद्र अब्दुल बहा यांनी आपल्या इच्छापत्रात (वसीयत मध्ये) आपल्या नातु म्हणजे शोगी आफेन्दी यांना प्रभू धर्माचा प्रथम रक्षक म्हणून नियुक्त केला आहे. शोगी आफेन्दी यांनी १९५१ मध्ये जेव्हां विश्वात ९ राष्ट्रीय आध्यात्मिक सभांची स्थापना झाली तेव्हां, अन्तर्राष्ट्रीय बहाई मण्डळाची स्थापना केली आणि प्रभूधर्माच्या अनुयायांना हा संदेश दिला कि हे अन्तर्राष्ट्रीय बहाई मंडळ भविष्याचा विश्व न्याय मंदिर आहे. शोगी आफेन्दी यांनी एका वरिष्ठ अमेरिकी बहाई 'मेसन रेमी' जे धर्मभुजा पण होते, त्यांना ह्या बहाई मण्डळाचा अध्यक्ष नियुक्त केला.

ह्या प्रमाणे शोगी आफेन्दी यांना मेसन रेमी ह्यांना आपल्या नंतर प्रभू धर्मा मध्ये सर्वोच्च स्थानाने सुशोभित करून त्यांना मौखिक रूपाने आपला उत्तराधिकारी आणि प्रभू धर्माचा दूसरा धर्मरक्षक म्हणून नियुक्त केला.

१९५७ साली शोगी आफेन्दी यांचे लंडन मध्ये अकस्मित निधन झाले व म्हणून ते मेसन रेमी यांच्या दूसरे धर्मरक्षक होण्या संबंधी काही लिखित संदेश सोडून गेले नाहीत. लवकरच इराणी धर्मभुजांनी एक षडयंत्र केले आणि एक गोपनिय बैठक घेतली, ज्यामध्ये हे निर्णय घेण्यात आले कि धर्मरक्षकाचे द्वार आता नेहमीसाठी बंद करण्यात यावे आणि त्यांनी बहाई विश्वात हे संदेश पाठविले की धर्मरक्षकाचा पद आता समाप्त झाला आहे.

मेसन रेमी यांनी अगोदर ह्या धर्मभुजांना खूप समजवले आणि त्यांनी सांगितले कि प्रभू धर्मास धर्मरक्षकाने वंचित करू नये. पण त्यांनी एक ऐकले नाही आणि बहाईयांना अशा अंधकारात फेकून दिले की आता त्यांनी परत येणे हे फक्त फार कठिणच नाही परंतु अशक्य आहे.

१९६० साली मेसन रेमी ह्यांनी आपल्याला दूसरा धर्मरक्षक म्हणून घोषित केले आणि ह्या प्रकारे अब्दुल बहा आणि शोगी आफेन्दी यांच्या सत्यतेला वाचवले.

५ डिसेंबर १९६१ मध्ये मेसन रेमी यांनी एका पत्राद्वारे श्री. जोएल मैरेन्जेला यांना बहाई धर्माचा तृतीय धर्मरक्षक म्हणून नियुक्त केले आणि त्यांना प्रभूधर्माचा कार्य सांभाळण्यास आमंत्रण दिले. तेव्हां पासून जोएल मैरेन्जेला धर्मनिष्ट बहाईयांचा मार्गदर्शन करित आहेत. १९९२ मध्ये धर्मनिष्ट बहाईयांना एक अत्यंत सुखद सफलता प्राप्त झाली आणि भारताच्या राजधानीत (दिल्लीत) धर्मनिष्ट बहाईयांची राष्ट्रीय बहाई परिषद स्थापित करण्यात आली.

आपण आपला संबंध धर्मविरूध्द, धर्मरक्षक विहीन संस्थांशी तोडून घ्या आणि धर्मनिष्ट बहाईमध्ये जोडून घ्या आणि खऱ्या प्रभू धर्माच्या सेवेत मग्न व्हा.

जर आपल्याला अधिक माहिती घ्यायची असेल, तर खाली दिलेल्या पत्त्यावर संपर्क साधा.

डॉ. ए. पारेख
राष्ट्रीय बहाई परिषद
पी.ओ. बॉक्स क्र. ५४,
वसई रोड, जिल्हा ठाणे - ४०१२०७,
महाराष्ट्र.